# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968, 1986 व 2020

# National Education Policy 1968, 1986 and 2020

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## गोषवारा

'गुरुकुल' पद्धतीकडून मेकॅलोच्या कारकून बनविणाऱ्या शिक्षण पद्धतीच्या मार्गाने आज आपण तीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतून प्रवास करीत 2020 च्या धोरणाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यापर्यंत येऊन पोचलो आहोत. जे राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 साली आले, ते कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. त्यात वयाच्या 14व्या वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि पात्रता, तीन भाषांचे सूत्र, सर्वांना शिक्षणाची समान संधी, 10+2+3 अशी संरचना होती. 1986 चे धोरण राजीव गांधींनी लागू केले. महिला, अनुसूचित जाती-जमातींसह सर्वांना समान शिक्षणाची संधी प्रदान करणे, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे, देशभरात 10+2+3 पॅटर्नची तात्काळ अंमलबजावणी करणे, शाळांमधून अन्न आणि आरोग्यदायी वातावरणाची योग्य उपलब्धता करून देणे, मुक्त विद्यापीठ आणि दूरस्थ शिक्षण संस्था उघडणे, राष्ट्रीय महत्त्व असलेल्या संस्थांना सक्षम बनवण्यावर भर होता. 1986 च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात पी.व्ही. नरसिंह राव सरकारने 1992 मध्ये बदल केले. नवोदय विद्यालयांमध्ये गुणवत्ता वाढीवर भर दिला. प्रत्येक राज्यात किमान एक मुक्त विद्यापीठ उघडण्याची तरतूद करण्यात आली. व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षांचा आधार घेतला गेला. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' मध्ये शाळाबाह्य मुलांना मुक्त शाळा प्रणालीद्वारे मुख्य प्रवाहात आणणे, पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर, सध्याची शिक्षण प्रणाली बदलून 3-8, 8-11, 11-14 आणि 14-18 वर्ष वयोगटातील नवीन 5+3+3+4 अभ्यासक्रम आणणे, व्यावसायिक शिक्षणावर भर देणे, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र - 'पारख'ची निर्मिती करणे, सर्व अभ्यासक्रम आंतरविद्याशाखीय करणे असे काही महत्त्वाचे बदल घडून येणार आहेत. 2022 पासून याची अंमलबजावणी होणार असल्याने येणाऱ्या काळात या धोरणाचे फायदे-तोटे लक्षात येतील.

Today we have traveled through three national education policies and reached the implementation stage of the 2020 policy through the 'Gurukul' method of Macaulay's clerical education system. The National Education Policy, which came out in 1968, was based on the recommendations of the Kothari Commission. It had free and compulsory education up to the age of 14, teacher training and qualification, three language formula, equal opportunity for education for all, 10+2+3 structure. 1986 policy implemented by Rajiv Gandhi. Providing equal educational opportunities to all including women, Scheduled Castes and Tribes, establishing district education and training institutes, immediate implementation of 10+2+3 pattern across the country, ensuring proper availability of food and healthy environment in schools, opening open universities and distance learning institutes, are major features of that policy. It was updated in 1992 when P.V. Narasimha Rao

was the Prime Minister. Provision was made to open at least one open university in every state. Common Entrance Tests were used for admission to professional and technical courses. The 'National Education Policy 2020' includes mainstreaming of out-of-school children through open school system, emphasis on basic literacy and numeracy, changing the current education system to a new 5+3+3+4 in the age groups of 3-8, 8-11, 11-14 and 14-18 years. Some of the important changes that will take place are emphasis on vocational education, creation of National Assessment Center - 'PARKH' to evaluate students, making all courses interdisciplinary. Since it will be implemented from 2022, the pros and cons of this policy will be realized in the coming period.

**बीजशब्द**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, National Educatioan Policy, एनईपी, NEP, मोफत आणि सक्तीचे शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, एनसीसी, एनएसएस, एनसीईआरटी, मुक्त विद्यापीठ

## प्रस्तावना

पूर्वी आपल्याकडे शिक्षणाची 'गुरुकुल' पद्धत होती. पुढे 1835च्या मेकॅलोच्या कारकून बनविणाऱ्या शिक्षण पद्धतीने आपली मानसिकता बदलत गेली. इंग्रजांनी निर्माण केलेली शिक्षण पद्धती आजही काही प्रमाणात सुरू आहे. सध्या ज्याची चर्चा सुरू आहे ते 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' म्हणजेच 'नॅशनल पॉलिसी ऑन एज्युकेशन' अर्थात 'एनपीई'. शिक्षणाचा प्रचार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' तयार केले आहे. यात ग्रामीण आणि शहरी भारतातील प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणाचा समावेश आहे. नव्या शैक्षणिक धोरणाने विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्याचा विकास होईल. विद्यार्थी नोकरी मागणारा नाही, तर इतरांना नोकरी देणारा होईल  असे अपेक्षित आहे. हा शिक्षणातील क्रांतीचा आराखडा आहे. हे धोरण ठरविण्यामागे भारत जगाचा नेता व्हावा असा दृष्टिकोन आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, शहरी आणि ग्रामीण भागातील निरक्षरतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने विविध कार्यक्रम आखले. भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी एकसमान शैक्षणिक प्रणालीसह संपूर्ण देशभरातील शिक्षणावर केंद्र सरकारच्या मजबूत नियंत्रणाची योजना मांडली. शिक्षण प्रणाली विकसित करण्यासाठी विद्यापीठ शिक्षण आयोग (1948–1949), माध्यमिक शिक्षण आयोग (1952–1953), विद्यापीठ अनुदान आयोग आणि कोठारी आयोग (1964–66) ची स्थापना करण्यात आली. पं. नेहरू यांनी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'सारख्या उच्च दर्जाच्या वैज्ञानिक शिक्षण संस्थांचा विकास केला. केंद्र सरकारने 1961 मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदे'ची (एनसीईआरटी) स्थापना केली. ही स्वायत्त संस्था केंद्र आणि राज्य सरकारांना शैक्षणिक धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी सल्ला देते.

पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 1968 मध्ये, दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी 1986 मध्ये आणि तिसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2020 मध्ये जाहीर केले. तीनही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा थोडक्यात संशोधनात्मक आणि तुलनात्मक आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968

जे राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 साली आले, ते कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये अशी –

### मोफत आणि सक्तीचे शिक्षण

भारतीय संविधानाच्या कलम 45 नुसार वयाच्या 14व्या वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण असले पाहिजे. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलाने अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला पाहिजे, याची खात्री करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत, असे या धोरणात नमूद होते.

### शिक्षकांचे शिक्षण आणि प्रशिक्षण

शिक्षकांचे उत्तम प्रशिक्षण झाले पाहिजे. प्रत्येक स्तरावर योग्य ती पात्रता शिक्षकांनी धारण केलेली असावी, ही अपेक्षा व्यक्त केली गेली.

### भाषा विकास

या धोरणात देशात भारतीय तसेच परदेशी भाषांच्या विकासावर भर देण्यात आला होता. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्याला हिंदी, इंग्रजी आणि त्याच्या राज्याची प्रादेशिक भाषा अवगत असावी, असे तीन भाषांचे सूत्र आखण्यात आले. माध्यमिक स्तरावर ऐच्छिक विषय म्हणून संस्कृत भाषेचा समावेश करण्यात आला.

### सर्वांना शिक्षणाची संधी

या धोरणांतर्गत देशातील प्रत्येक मुलाला जात, धर्म, प्रदेश वेगवेगळे असले तरी शिक्षण मिळाले पाहिजे. मागासवर्गीय, अल्पसंख्यक मुले, मुली आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग मुलांना शिक्षणाच्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी विशेष भर देण्यात यावा, अशी तरतूद यात होती.

### समान शैक्षणिक संरचना

संपूर्ण देशात शिक्षणाची रचना एकसमान असावी, यावर भर देण्यात आला. उच्च माध्यमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत 10+2+3 अशी आखणी करण्यात आली.

### प्रगतीचा आढावा

सरकारने वेळोवेळी देशातील शिक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेऊन भविष्यातील विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे मांडली पाहिजेत., असे या धोरणात नमूद करण्यात आले.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 मधील अडचणी

1968 चे राष्ट्रीय शिक्षण धोरण फारसे यशस्वी झाले नाही, असा आरोप होतो. याची अनेक कारणे होती. एकतर त्यावेळी कृतीचा योग्य कार्यक्रम आणला गेला नाही. दुसरे म्हणजे, निधीची कमतरता होती. त्या सुमारास भारताची अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. तिसरे म्हणजे, त्यावेळी शिक्षण राज्याच्या यादीत होते, त्यामुळे राज्ये ही योजना कशी राबवतील यावर केंद्राची भूमिका फारशी प्रभावी नव्हती किंवा त्यावर केंद्राचे फारसे नियंत्रण नव्हते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 काही प्रमाणात यशस्वी झाले. 10+2+3 शिक्षण पद्धतीचा समावेश झाला. तीन भाषांचे सूत्र लागू झाले, ज्याचे पालन आजही बहुतेक राज्यांत केले जाते. गणित आणि विज्ञान विषयाला प्राधान्य मिळाले.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986

इंदिरा गांधीच्या निधनानंतर राजीव गांधी युवावस्थेत पंतप्रधान झाले. 1986 चे धोरण राजीव गांधींनी लागू केले. पुढे पी.व्ही. नरसिंह राव पंतप्रधान असताना 1992 मध्ये ते अद्ययावत करण्यात आले. असमानता दूर करण्यावर आणि शिक्षणाच्या संधी समान करण्यावर विशेष भर देण्यात येऊन तसे नावही देण्यात आले. या धोरणाचा मुख्य उद्देश महिला, अनुसूचित जाती–जमातींसह सर्वांना समान शिक्षणाची संधी प्रदान करणे होता. शिक्षणाचे विकेंद्रीकरण आणि जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे, हा एक उद्देश या धोरणात होता. देशभरात शिक्षणाच्या 10+2+3 पॅटर्नची तात्काळ अंमलबजावणी करण्याची शिफारस करण्यात आली होती. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शैक्षणिक कार्यक्रमांची तसेच शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची शिफारस करण्यात आली होती. शाळांमधून अन्न आणि आरोग्यदायी वातावरणाची योग्य उपलब्धता करण्याचीही शिफारस करण्यात आली. यापूर्वीच्या धोरणाप्रमाणेच प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले. भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक विज्ञान, सांख्यिकी, इतिहास हे विषय आणि नागरिकांची राष्ट्रीय आणि घटनात्मक जबाबदारी यांसारख्या संकल्पना शिकवण्यासाठी प्राधान्य दिले गेले.

1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मुक्त विद्यापीठ आणि दूरस्थ शिक्षण संस्था उघडून उच्च शिक्षणाचा विस्तार केला जाईल आणि अशा शिक्षणाच्या पद्धतीला यूजीसीकडून समान दर्जा आणि मान्यता दिली जाईल, राष्ट्रीय महत्त्व

असलेल्या UGC, NCERT, NIEPA, AICTE, ICAR, IMC इत्यादी संस्थांना राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेला आकार देण्यासाठी आणि राष्ट्राच्या उदयोन्मुख मागण्यांना तोंड देण्यासाठी सक्षम बनवण्यात येईल असे जाहीर केले गेले.

1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे काही नवे पैलू होते. त्यात खडू–फळा मोहीम, क्रीडा साहित्य आणि खेळणी, सर्व ऋतूंसाठी योग्य असलेल्या वर्गखोल्या, प्राथमिक विज्ञान संच पेटी, राष्ट्रीय अभ्यासक्रम, नवोदय विद्यालय यांचा समावेश होता.

1968 च्या धोरणाच्या तुलनेत 1986 च्या धोरणाने चांगली कामगिरी केली. याची अनेक कारणे होती. सर्वप्रथम, हे धोरण 1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीनंतर आले. या दुरुस्तीमध्ये शिक्षण, वने, वजन आणि मापे, वन्य प्राणी आणि पक्ष्यांचे संरक्षण आणि न्याय प्रशासन यांसह पाच विषय राज्यांतून समवर्ती यादीमध्ये हस्तांतरित करण्यात आले. दुसरे म्हणजे, केंद्र व्यापक जबाबदारी स्वीकारण्यास सक्षम झाले होते आणि या धोरणाच्या अनुषंगाने अनेक कार्यक्रम सुरू केले गेले. सर्व शिक्षा अभियान, माध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालये, केंद्रीय विद्यालये सुरू झाल्या होत्या. एकंदरीत शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने या धोरणाचे महत्त्व मान्य करावे लागते.

## सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1992

1986 च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात पी.व्ही. नरसिंह राव सरकारने 1992 मध्ये बदल केले. नवीन विशेष शाळा उघडण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी या क्षेत्रात पुढे येण्यासाठी तरतुदी केल्या गेल्या. नवोदय विद्यालयांमध्ये गुणवत्ता वाढीवर भर देऊन इतर सर्व शाळांसाठी एक आदर्श प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला. प्रत्येक राज्यात किमान एक मुक्त विद्यापीठ उघडण्याची तरतूद करण्यात आली होती आणि त्यांचे नियमन करण्यासाठी IGNOU इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटीला तांत्रिक सहाय्य आणि दूरस्थ शिक्षण परिषद द्यावी लागली.

सुधारणांमध्ये एक आणखी गोष्ट झाली. देशातील सर्व व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी अखिल भारतीय सामायिक प्रवेश परीक्षांचा आधार घेतला गेला. खेळ आणि इतर शारीरिक हालचालींवर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांना एनसीसी आणि एनएसएसमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या सुधारणांमुळे राष्ट्राच्या शिक्षणव्यवस्थेमध्ये सकारात्मक बदल घडून आले.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) 2020' ला मंजूरी दिली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेत शालेय शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत अनेक बदल केले गेले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे उद्दिष्ट भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

या शैक्षणिक धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये अशी –

2030 पर्यंत शालेय शिक्षणात 100 टक्के सकल नोंदणी गुणोत्तरासह (GER) पूर्वस्कूल ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, हा महत्त्वाचा उद्देश या धोरणात आहे. 2 कोटी शाळाबाह्य मुलांना मुक्त शाळा प्रणालीद्वारे मुख्य प्रवाहात आणणे, हाही उद्देश आहे. सध्याची 10+2+3 प्रणाली अनुक्रमे 3–8, 8–11, 11–14 आणि 14–18 वर्षे वयोगटातील नवीन 5+3+3+4 अभ्यासक्रम संरचनेद्वारे बदलली जाईल. 3–6 वर्षे वयोगट जागतिक स्तरावर मुलांच्या मानसिक क्षमतांच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखला जातो. या वयात आतापर्यंत नसलेला महत्त्वाचा भाग समाविष्ट होईल. तीन वर्षांच्या अंगणवाडी/पूर्व–शालेय शिक्षणासह 12 वर्षांचे शालेय शिक्षण देखील असेल.

10वी आणि 12वी बोर्डाच्या परीक्षा सोप्या करून सर्व विद्यार्थ्यांना दोनदा परीक्षा देण्याची परवानगी दिली जावी, अशी शिफारस त्यात आहे. विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवलेल्या तथ्यांऐवजी त्यांच्या मुख्य कौशल्यांची चाचणी घेण्याची योजना आहे. नवीन मान्यता फ्रेमवर्क आणि सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही शाळांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणासह, शाळा

प्रशासनात बदल केले जाणार आहेत. पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर देण्याचे नियोजन आहे. शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अभ्यासक्रमेतर, व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वर्गीकरण असणार नाही, असे त्यात नमूद आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. इयत्ता 6 वी पासून इंटर्नशिपसह शिक्षण सुरू होणार आहे. किमान इयत्ता 5 पर्यंत मातृभाषा/प्रादेशिक भाषेत शिक्षण होईल. कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही. 360–डिग्री होलिस्टिक प्रोग्रेस कार्डसह मूल्यांकन सुधारणा, शिकण्याचे परिणाम प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेतला जाईल. नॅशनल कौन्सिल ऑफ टीचर एज्युकेशन (NCTE) द्वारे नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (NCERT) सोबत सल्लामसलत करून शिक्षक शिक्षणासाठी एक नवीन आणि व्यापक राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्क (NCFTE) 2021 तयार केला जाईल.

या धोरणात पदवीसंदर्भात काही बदल सुचविण्यात आले आहेत. अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता 4 वर्षांची एकात्मिक बी.एड. पदवी असेल. हे 2030 पर्यंत करण्याचे नियोजन आहे. उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण सध्या २६.३ टक्के आहे. ते 2035 पर्यंत 50 टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल. तसेच, उच्च शिक्षणात 5 कोटी जागा जोडल्या जाणार आहेत. लवचिक अभ्यासक्रमासह होलिस्टिक अंडरग्रेजुएट शिक्षण 3 किंवा 4 वर्षांचे असू शकते आणि या कालावधीत एकापेक्षा जास्त एक्झिट पर्याय आणि योग्य प्रमाणीकरण मिळणार असल्याचे नमूद आहे. एम.फिल. अभ्यासक्रम बंद केले जातील. पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. स्तरावरील सर्व अभ्यासक्रम आता आंतरविद्याशाखीय असतील.

बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे (MERUs), IITs, IIM च्या बरोबरीने, देशातील जागतिक दर्जाच्या सर्वोत्कृष्ट बहुविद्याशाखीय शिक्षणाचे मॉडेल म्हणून स्थापित केले जातील. नॅशनल रिसर्च फाऊंडेशन ही उच्च शिक्षणामध्ये मजबूत संशोधन संस्कृती वाढवण्यासाठी आणि संशोधन क्षमता निर्माण करण्यासाठी सर्वोच्च संस्था म्हणून तयार केली जाईल. भारतीय उच्च शिक्षण आयोग (HECI) वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी एकच छत्र म्हणून स्थापन केले जाईल. तसेच, HECI कडे खालील चार स्वतंत्र परिषदा असतील –

1. राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (NHERC), नियमनासाठी,
2. सामान्य शिक्षण परिषद (GEC), मानक–सेटिंगसाठी,
3. उच्च शिक्षण अनुदान परिषद (HEGC), निधीसाठी,
4. राष्ट्रीय मान्यता परिषद (NAC) मान्यता प्राप्त करण्यासाठी.

सर्व महाविद्यालयांची संलग्नता 15 वर्षात टप्प्याटप्प्याने बंद केली जाणार आहे आणि महाविद्यालयांना दर्जाबद्ध स्वायत्तता देण्यासाठी टप्प्यानुसार यंत्रणा स्थापन केली जाणार आहे. कालांतराने, प्रत्येक महाविद्यालय एकतर स्वायत्त पदवी–अनुदान महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे.

या शैक्षणिक धोरणात आणखी काही बदल सुचविले आहेत. एक स्वायत्त संस्था – नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम (NETF) निर्माण केली जाईल. शिक्षण, मूल्यमापन, नियोजन, प्रशासन वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर विचारांची मुक्त देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करण्यासाठी तयार केले जाईल. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र – 'पारख'ची निर्मिती करण्यात येईल. यामुळे परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस उभारण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पाली, पर्शियन आणि प्राकृत, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशन आणि इंटरप्रिटेशनची स्थापना केली जाईल. तसेच शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढविण्याचीही योजना आहे.

## समारोप

2015 मध्ये श्रीमती स्मृती इराणी मनुष्यबळ विकास मंत्री होत्या. त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून ऑक्टोबर 2016 मध्ये नवे शैक्षणिक धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागवण्यात आल्या. मात्र हे धोरण मंजूर होऊ शकले नाही. या धोरण निर्मितीचे प्रमुख टी. एस. आर. सुब्रमण्यम हे होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० साठी पुन्हा दुसरा प्रयत्न इस्त्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समिती बनवून करण्यात आला. त्यात बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या. नवीन शिक्षण प्रणालीच्या आधारे भारत जागतिक महासत्ता होऊ शकेल, असे अनेक शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. गांधीजींची मुलोद्योगी शिक्षा (नई तालीम) प्रणाली किंवा कोठारी आयोगाच्या तरतुदी

या देशाला प्रगतीकडे घेऊन जायला अतिशय सक्षम होत्या. पण कागदावरून प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत अनेक अडचणी असतात. म्हणूनच शिक्षणक्षेत्रातील विविध योजनांचे म्हणावे तसे फायदे मिळाले नाहीत. 2020 च्या या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी 2022 पासून होणार असल्याचे निश्चित झाले आहे. येणारा काळच ठरवेल की यात केलेल्या सुधारणा या देशासाठी किती लाभदायक आणि प्रगतीपथावर नेणाऱ्या ठरतात ते!

## संदर्भ


Mandavkar Pavan, 'The Role of Languages in National Education System of India', Paper Presentation, Seventeenth International Conference on Language, Literature and Culture, Abu Dhabi, UAE, 11 and 12 Aug. 2022

https://byjusexamprep.com/national-educational-policy-in-marathi-i

https://www.mahamtb.com/Encyc/2022/1/9/new-education-policy.html

Government Circulars, New National Education Policy 2020, Published on various websites



Published in National Conference Proceedings:

1. Mandavkar Pavan, National Education Policy 1968, 1986 and 2020, NEP 2020: Its Impletation in Education, Shivramji Moghe College, Kelapur, Indira Mahavidyalaya, Kalamb, Sardar Patel College Mohada, Conference Proceeding ISBN 978-93-95008, 23 Sep. 2022, pp. 13-18
2. Available at SSRN: https://ssrn.com/abstract=4286350